INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील 'R' (Reading) स्किल विकसीत करण्यासाठी Room To Read उपक्रमाची उपयोगिता

**अश्विनी अनिलराव लाठकर**

उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद, औरंगाबाद

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-31986323/IRJHIS2107019

## प्रस्तावना :

Room To Read ह्या संस्थेचे संस्थापक जॉन वुड यांनी अनेक राज्यांतील अनेक शासकीय शाळेमध्ये बालवाचनालयास सुरुवात केली. औरंगाबाद जिल्ह्यात जानकीदेवी बजाज ह्यांच्या सहाय्याने इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी गोष्टींचे पुस्तके पुरविल्या जातात. लहान वर्गातील मुलांना जास्तीत जास्त आणि चांगल्यात चांगले त्यांच्या आवडीचे, त्यांना समजेल, रुचेल अशा भाषेतील, शब्दांतील चित्ररुप असे अनेक पुस्तके त्यांनी दिली.

विद्यार्थ्यांना समजपूर्वक वाचता यावे. जे वाचले त्यातून त्यांना अर्थ काढता यावा, विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी, आवड निर्माण व्हावी हिच यामागची उद्दिष्टे होय.

वाचनाबरोबरच विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर, आत्मविश्वासू बनवणे हा ही उद्देश होता. हे वाचनालय म्हणजे बालकांनी बालकांसाठी चालविलेले वाचनालय होय. ह्यामध्ये एक बालवाचनालय समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये मुलांनीच वाचनालयासाठी काही नियम बनवले. त्यांनीच पुस्तकांची देवाण-घेवाण केली, नोंदी ठेवल्या. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

या सर्वांमुळे जिल्ह्यातील शिक्षकांनाही खुप फायदा झाला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. जिल्हा परिषद शाळेमध्येही पटसंख्या वाढण्यास मदत झाली व वर्गात विद्यार्थी उपस्थितीही वाढली. गोष्टीच्या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना चित्रकलेचीही आवड निर्माण झाली. वेगवेगळे चित्र काढणे, रंग भरणे यात त्यांना रस वाटू लागला. वाचनालयाच्या विविध वाचन प्रकारामुळे त्यांना गोष्टींचे झाड तयार करणे, गोष्टींना शिर्षक देणे, नवीन गोष्ट तयार करणे, लिहिणे. गोष्ट संक्षिप्त रुपात लिहिणे, पात्र परिचय देणे, शिर्षकाचे झाड बनवणे, गोष्ट वाढविणे, पत्रलेखन अशा विविध गोष्टींचे ज्ञान मिळाले. विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली. नवनवीन गोष्टी त्यांना शिकायला मिळाल्या.

## Room To Read **उपयोगिता :**

वेगवेगळ्या वाचन प्रकारांमुळे सुध्दा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. एकमेकांना मदत करणे, सहानुभूती असे मूल्य रुजत गेले. 'एक मिनिटात बोला', 'माझ्याबद्दल सांगा' ह्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. उन्हाळी सुट्टी, दिवाळी सुट्टी किंवा कोरोनाचा लॉकडाऊन ह्या सर्व सुट्ट्यांमध्ये सुध्दा मुलांना पुस्तके वाचण्यास उपलब्ध करुन देण्यात आली होती.

या सर्वांचा एक सकारात्मक परिणाम हा झाला की 2019 मध्ये इयत्ता 5 वी मध्ये शिकत असलेल्या 'भागवत नारायण आष्टेकर' याने लिहिलेली 'हत्तीदादाची कामगिरी' ही गोष्ट 'चिमुकल्यांच्या गोष्टी' या पुस्तकात प्रकाशित झाली आणि विद्यार्थ्यांना अजूनच प्रेरणा मिळाली. त्यांच्यात अधिक उत्साह निर्माण झाला. भागवतचे ते यश पाहून आम्हा सर्वांनाच आनंद झाला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. वाचनाची आवड निर्माण झाली.

**Room To Read** सुरु केलेल्या बालवाचनालय गावातील नागरिक, महिला यांच्यासाठी सुध्दा खुले होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थी, गावातील नागरीक व महिला या सर्वांना वाचनासाठी प्रेरित करण्यात आले. त्यामुळे त्यांच्यामध्ये सुध्दा वाचनाची आवड निर्माण झाली.

ऑगष्ट 2018 पासून सुरु झालेले **Room To Read** च्या बालवाचनालयात आजपर्यंत तीन ते चार हजारापर्यंत पुस्तके विद्यार्थ्यांसाठी वाचण्यास उपलब्ध आहेत.म्हणतात ना 'वाचन हे मनाचे अन्न आहे' या म्हणीप्रमाणे आमच्या विद्यार्थ्यांनाही आता रोजच हे अन्न खाण्याची सवय जडली आहे.

'वाचू आनंदे' ही उक्ती सत्यात उतरवणारी संस्था म्हणजे Room To Read**.**

Room To Read या संस्थेमार्फत 2018-19 या शैक्षणिक वर्षापासून औरंगाबाद तालुक्यातील 30 शाळांना मोफत वाचनालय देण्यात आले. वाचनालयासाठी प्रथम एक स्वतंत्र रुम ठरवून तीला रंगरंगोटी व मुलांना आकर्षून घेणारी आकर्षक पेंटींग संस्थेमार्फतच करण्यात आली.

**निष्कर्ष :**

Room To Read चे वाचनालय हे शाळेला, शिक्षकांना व विद्यार्थ्यांना स्तब्ध करणारे आहे. सलग 3 वर्षे या संस्थेने जिल्हा परिषद शाळेला भरपुर पुस्तके, मुलांना अवश्यक स्टेशनरी, कोरे कागद, कलर बॉक्स, पेन्सिल्स, खोडरबर, शार्पनर, पीना, चिकटटेप, कार्डशिट्स असे भरपुर साहित्य दिले. हे साहित्य आणि पुस्तके आपोआपच विद्यार्थ्यांना वाचनालयाकडे आकर्षित करणारी होती. पुस्तकांची मुखपृष्ठे, मलपृष्ठे व बोलकी चित्रे म्हणजे मुलांसाठी भरी मज्जाच !

वाचनालयाचा वापर, वाचनालयातील वातावरण, नियम, वाचन प्रकार, उपक्रम, त्यांच्या नोंदी या संदर्भात संस्थेमार्फत दर्जेदार असे प्रशिक्षण संबंधित शाळेतील मुख्याध्यापक व वाचनालय प्रमुख, 1 शिक्षक यांना देण्यात आले. त्यापध्दतीची कार्यवाही शाळेत करतांना कोणतीही अडचण आल्यास **Room To Read** मार्फत सखोल मार्गदर्शन केले जाते.

हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना सुध्दा असल्यामुळे आम्हाला अध्ययन अध्यापनात भाषेची फार मोठी अडचण होती. पण या वाचनालयातील पुस्तकातील मराठी शब्द, वाक्य, मुलांच्या कानावर सतत पडत गेल्यामुळे मुलांनाही मराठी भाषा आपली वाटू लागली. भाषेची अडचण आता बऱ्यापैकी कमी झाली आहे. आता बरीच मुले मराठी बोलतात. मराठीतुन आपले मत व्यक्त करतात, परिपाठात आवडलेल्या गोष्टी सांगतात. लाजरी बुजरी मुले ही छोटा प्रयत्न करतात. विशेष म्हणजे मुलांना स्वयंशिस्त लागू लागली आहे.

मुलांना वाचन उपक्रम अतिशय आवडतात. पुस्तक वाचण्यात, चित्र काढण्यात आणि ती रंगवण्यात मुले मग्न होतात. त्यांच्या या आवडीचा उपयोग चित्र वर्णन, चित्रावरुन गोष्ट तयार करणे यामध्ये होतो. पुस्तके वाचण्याबरोबरच मुले पुस्तकांची काळजीही घेतात. यासाठी त्यांना पुस्तकांचा दवाखाना या संकल्पनेच्या उपयोग झाला. यामुळे त्यांच्या संवेदनशिलता, शेअरींग, कष्ट ही मुल्ये रुजली गेली. कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेशी जोडून ठेवण्याचे काम या वाचनालयाने केले.

## सारांश :

Room To Read या संस्थेने वाचन संस्कृती टिकावी, जोपासली जावी, विद्यार्थ्यांची निरिक्षण शक्ती, जिज्ञासू वृत्ती, आत्मविश्वास, जागृत करण्यासाठी सुरु केलेल्या उपक्रमामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील **LSRW** मधील **Reading** हे स्किल विकसीत करण्यासाठी जिल्हा परिषद शाळांना व शाळांमधील विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचे योगदान **Room To Read** या उपक्रमामुळे लाभलेले आहे.

## संदर्भ :

1. राष्ट्रीय शालेय अभ्यासक्रम आराखडा - 2005.
2. मुलांच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम - 2009.
3. प्रा. यशपाल समिती अहवाल.
4. ज्ञानरचनावाद.
5. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शा.नि. 2015